# पंचायत समिती डहाणू

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

**विभागाचे नाव** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

**खाते प्रमुखाचे पदनाम**

**विभागाचा दुरध्वनी क्रमांक**

**विभागाचा ईमेल**

**पंचायत समिती ,डहाणू**

**<u>ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी-</u>**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम मागणी आधारित धोरण असुन केंद्र शासन पुरस्कृत वर्धीत वेग कार्यक्रम, स्वजलधारा व राज्य शासन पुरस्कृत महाजल तसेच बिगर आदिवासी / आदिवासी अंतर्गत कामाचा समावेश करुन सन 2009-2010 पासुन सदर कार्यक्रमांचे रुपांतर **<u>राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम</u>** असे केले आहे.
पाणी पुरवठा योजनेंतर्गत खालील पाणी पुरवठ्याच्या योजना हाती घेता येतील.

- साधी विहीर
- अस्तीत्वातील विहीरींचे रुंदीकरण व खोलीकरण
- विंधन विहीर (हातपंप)
- लघु नळ पाणी पुरवठा योजना
- शिवकालीन पाणी साठवण योजना
- अस्तीत्वातील योजनेची दुरुस्ती
- अस्तीत्वातील योजनेतील उद्भवाचे बळकटीकरण
- योजना विस्तारीकरण
- पुरक योजना
- नविन योजना

वरिलपैकी कोणतीही योजना आपल्या गावासाठी राबववयाची झाल्यास आपल्या तालुक्यातील उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेशी संपर्क साधावा.
पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी, त्याचे नियोजन व कार्यवाही तसेच विहित कालावधी खालीलप्रमाणे आहे.

- **<u>ठळकवैशिष्ट्ये-</u>**

**<u>धोरणातील महत्वाची तत्वे व प्राधान्यक्रम-</u>**

- गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याचे उपाययोजनांचा आढावा घेवून त्यातील स्त्रोतांचे संवर्धन व बळकटीकरण करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणे करणे.
- गुणवत्ताबाधीत गावांमध्ये सुरक्षित स्त्रोत विकसीत करण्याकरिता उपाययोजना करणे.
- गावाच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे पुरक योजनांचा विचार करणे.
- उपाययोजना प्रस्तावित करतांना किमान खर्चावर आधारीत विकल्पाचा विचार करणे.
- एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रीत उपाययोजना किफायतशीर असल्यास त्यास प्राधान्य देणे.
- 100% घरगुती नळ जोडणेचा समावेश अनिवार्य करणे.
- गाव कृती आराखडा तयार करणे.
- काम सुरु करण्यापूर्वी गांव किमान 60 % हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे.
- मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.